






**अधिक माहितीसाठी**


**कृषि विज्ञान केंद्र**

किल्ला, ता. रोहा,जि. रायगड

फोन क्र. (०२१९४) २०३१०८

ई मेल – kvk_roha@rediffmail.com


# पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा २००१




**कृषि विज्ञान केंद्र**

किल्ला, ता. रोहा,जि. रायगड

**डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ**

दापोली – ४१५ ७१२, जि. रत्नागिरी

# पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा २००१


**लेखक व संकलक :**

प्रा. जीवन आरेकर, विषय विशेषज्ञ (वनस्पती विकृती शास्त्र)
प्रा. माधव गित्ते, विषय विशेषज्ञ (मत्स शास्त्र)
श्री. सचिन कार्ले कार्यक्रम सहाय्यक
डॉ. आनंद हणमंतेविषय विशेषज्ञ (पशु संवर्धन व दुग्धशास्त्र)

**संपादक :**

डॉ. मनोज तलाठी, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र किल्ला - रोहा

**मार्गदर्शक :**

डॉ. संजय भावे, संचालक विस्तार शिक्षण,
डॉ. बाबासाहेब कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
डॉ. चारी आप्पाजी, प्रधान शास्त्रज्ञ,
विभागीय प्रकल्प संचालनालय, विभाग - ५ (भाकृअनुप), हैद्राबाद



**प्रकाशक :**

कार्यक्रम समन्वयक
कृषि विज्ञान केंद्र, किल्ला - रोहा
डॉ. बाळासाहेब कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

**सौजन्य :**

पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण
कृषि मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली

**मुद्रक :**

गुजर ऑफसेट, रोहा. मो. : ९०११८५९७२४

**प्रकाशन वर्ष - डिसेंबर २०१४**


# पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा २००१

## १. प्रस्तावना :

जगातील बऱ्याच राष्ट्रांमध्ये जकाती व व्यापार विषयक सर्वसाधारण करार (गॅट GATT) अंतर्गत १९८६ ते १९९४ दरम्यान झालेल्या चर्चा ज्यांना सर्वसाधारणत: उरूग्वे चर्चा म्हणून ओळखले जाते, त्यात प्रथमच शेतीसंबंधीत व्यापाराचे विशेष निर्णय घेतले गेले. या करारातील सर्वात विवादास्पद मुद्दे हे व्यापार विषयक बौध्दिक हक्क (TRIPS) अंतर्गत जैवीक सामग्रीला दिल्या जाणाऱ्या स्वामित्व हक्का विषयी होते.

ट्रीप्स करारा अंतर्गत सही करणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला पिकांच्या जाती संरक्षित करण्याचे बंधन आहे. सदस्य राष्ट्र स्वामित्व हक्क किंवा स्वयंनिर्मित प्रक्रिया राबवून किंवा दोन्ही प्रक्रियांचा वापर करून जाती संरक्षित करू शकतात. भारताने पीक वाण नोंदणीसाठी (Patent) स्वामित्व हक्क प्रक्रिया नाकारून स्वयंनिर्मित पध्दतीच्या वापराचा निर्णय घेतलेला आहे. स्वयंनिर्मित प्रणाली मध्ये देशात पिकांच्या प्रजाती विकसीत करणाऱ्यांना विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. थोडक्यात ट्रीप्स ही एक लवचिक प्रणाली आहे, जी बऱ्याचशा मुद्यांवर त्या त्या राष्ट्राला विवेकबुध्दीनुसार निर्णय घ्यायची परवानगी देते. या प्रणाली अंतर्गत करारांना पूर्ण करण्यासाठी भारताने आपले स्वत:चे नियम/कायदे बनवायला सुरूवात केलेली आहे.

त्याचाच एक भाग म्हणून भारतात २००१ मध्ये, पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा अस्तित्वात आला. या कायद्यात असणाऱ्या विकसनशील देशांना उपयुक्त ठरणाऱ्या कलमांमुळे हा कायदा खूपच वैशिष्टपूर्ण आणि महत्त्वाचा समजला जातो. ट्रीप्स कराराच्या लवचिकतेचा पुरेपूर उपयोग करून पीक पैदासकारांच्या हक्कांबरोबरच शेतकऱ्यांच्या हक्कांनाही या कायद्यात विशेष महत्त्व देण्यात आलेले आहे. यात संशोधन कर्त्यांबरोबरच जनसामान्य शेतकऱ्यांच्या सुरक्षेचाही पुरेपूर विचार केलेला आहे. शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या औपचारिक अधिकारांबरोबरच त्याच्या आत्मविश्वासाला कुठल्याही प्रकारची हानी पोहोचणार नाही याची पुरेपूर काळजी हा कायदा तयार करताना घेण्यात आली आहे. हा कायदा आपल्या देशांतर्गत परीस्थितीशी सुसंगत असणाऱ्या आणि विकसित राष्ट्रांनी निर्धारीत केलेल्या मानकांना दूर ठेवून पुर्णपणे स्वयंनिर्मित प्रक्रिया/प्रणालीचा अवलंब करतो. हा या कायद्याचा सर्वात सकारात्मक पैलू आहे. या कायद्याने विकसनशील राष्ट्रांसाठी एक आदर्श मंच तयार केला आहे, ज्यामध्ये संशोधक/पीक पैदासकारांबरोबरच शेतकऱ्यांच्या हक्कांचाही विचार केलेला आहे.

कृषि, उद्यानविद्या, पुष्पविद्या आणि वनशेती मध्ये उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यासाठी नवीन उत्पादक जाती निर्माण करणे हा सर्वात महत्वाचा घटक आहे. नवीन पीक

प्रजातींचा/जातींचा विकास व प्रसार या प्रक्रिया ग्रामीण भागातील उत्पादन वाढविण्यासाठी व एकंदर शेतीच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाची भुमिका बजावतात. पिकांच्या नवीन जाती विकसित करण्याची प्रक्रिया ही खूप वेळ लागणारी आणि खर्चिक असते. त्यामुळे त्या प्रक्रियेस चालना द्यायची असेल तर ती प्रक्रिया नफ्याची/फायद्याची असण्यासाठी पिकवाणांच्या स्वामित्व हक्कांची अशी प्रभावी अंमलबजावणी करावी लागेल. यामुळे नवीन वाणांच्या निर्मितीस प्रोत्साहन मिळून सामाजिक विकास होऊ शकेल.

## २. प्रमुख उद्दीष्टे :

१) या कायद्यांतर्गत शेतकरी व शास्त्रज्ञांच्या हक्कांच्या संरक्षणार्थ सक्षम संरचना स्थापन करणे व कृषि विकासास गती देण्यासाठी विविध पिकांच्या नवीन वाण निर्मितीस उत्तेजन देणे.

२) पीक अनुवंशिक साधनांचे संवर्धन, त्यांची सुधारणा व पिकांचे नवीन वाण विकसित करताना या मोलाच्या कार्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांची जाणीव व संरक्षण करणे.

३) पीक पैदासकारांच्या हक्कांचे संरक्षण करून खाजगी व सरकारी क्षेत्रातील संशोधनास उत्तेजन देऊन संशोधन व गुंतवणुकीस चालना देणे व नवनवीन पिक वाण विकसीत करणे.

४) देशातील बियाणे उद्योगाची झपाट्याने प्रगती करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे जेणे करून शेतकऱ्यांना उत्तम दर्जाचे शुध्द व दर्जेदार बियाणांची पेरणीच्या वेळी उपलब्धता होईल.

## ३. प्राधिकरणाची महत्त्वाची कार्ये :

१) प्रचलीत प्रसारीत वाणांची व नवीन पीक वाणांची नोंदणी करणे.

२) नोंदणीकरीता वाणातील वेगळेपणा, एकसारखेपणा आणि स्थिरता यांच्या चाचणी मानकांची नवीन पिकांसाठी निर्मिती करणे.

३) नोंदणी झालेल्या पीक वाणांचे वर्गीकरण व नोंदणीकरण करणे.

४) सर्व पीकवाणां करीता सक्तीची पटनोंदणीची सोय उपलब्ध करणे.

५) अनुक्रमिता, नोंदणीकरण व पटनोंदणीची सेवा शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देणे.

६) उपयुक्त पिकांचे व त्यांच्या जंगली वाणांच्या पीक अनुवंशिक साधनांचे संवर्धन व सुधारणा कामी मोलाचे योगदान असलेल्या आदिम जमातीचे, गाव समुहाचे व शेतकऱ्यांचा यथोचित सत्कार करणे.

७) पीक वाणांच्या राष्ट्रीय संकलनाचे जतन करणे.

८) राष्ट्रीय जनुकीय कोषाची जपवणूक करणे.

## ४. पीक वाणांचे नोंदणीसाठी वर्गीकरणे:

### ४.१ शेतकऱ्यांचे वाण (Farmers Variety) असा वाण अथवा प्रजाती जी

१. शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षेपरंपरेने आपल्या शेतात वाढवलेली आणि विकसीत केली असेल.



२. अशी वन्यप्रजाती अथवा भू-प्रजाती जिच्याबद्दल शेतकऱ्यांना परिपुर्णज्ञान प्राप्त झालेले आहे.

सदर कायद्यात अशा शेतकरी वाणाच्या नोंदणी करण्याकरीता कुठल्याही प्रकारचे (जसे अर्ज फी, नोंदणीकरण फी, प्रतिज्ञापत्र) शुल्क आकरले जात नाही.

### ४.२ प्रचलीत वाण (Extant Variety) : असा वाण जो भारतात उपलब्ध असून जो

१. बियाणे कायदा १९६६ च्या कलम ५ अंतर्गत नोंदवला गेला आहे किंवा

२. शेतकऱ्याचा वाण किंवा

३. असा वाण जो सर्वांच्या माहितीतील आहे किंवा

४. इतर कुठलाही वाण जो लोकांच्या वापरात आहे.

### ४.३ नवीन वाण (New Variety) : असा वाण जो संशोधनातून निर्माण केला गेलेला आहे व जो एक वर्षापेक्षा जास्त काळ बाजारपेठेत उपलब्ध नाही.

## ५. पीक वाण व शेतकरी हक्क संरक्षण कायद्यातील विविध हक्क :

### ५.१ पीक पैदासकार हक्क (Plant Breederes Right) :

पीक पैदासकार त्याने निर्मित केलेल्या वाणास पुरेसे संरक्षण देण्यात येणार आहे. संरक्षित वाणाचा कोणत्याही प्रकारे वापर करणे, विक्री करणे, मोठ्या प्रमाणात लागवड करून उत्तन्न घेणे, त्या वाणाची आयात व निर्यात करणे, त्या वाणाचे अधिकार पत्र दुसऱ्यास देणे याचे संपुर्ण अधिकार त्या पीक पैदासकारास प्रदान करण्यात आले आहेत.

### ५.२ संशोधकांचा हक्क (Researchers Right) :

संशोधन करण्यास व नवीन वाण विकसित करण्यास संशोधकास संरक्षित वाणाचा वापर करण्याची मुभा या कायद्याअंतर्गत प्रदान करण्यात आली आहे; परंतु त्या संशोधकाकडून त्याच संरक्षित वाणाचा वापर पुन्हा-पुन्हा होत असेल अथवा त्या वाणाचा वापर व्यावसायिक दृष्ट्या नवीन वाण तयार करण्यासाठी होत असेल तर त्या संशोधकास संरक्षित वाणाच्या मालकांकडून अधिकारपत्र घेणे बंधनकारक राहील.

### ५.३ समुदायाचा हक्क (Community Rights) :

- एखाद्या गावाचा किंवा ग्रामीण समुदायाचा संरक्षित पीक वाण निर्मितीकरीता दिलेल्या योगदाना बद्दल प्राधिकरणा मार्फत मोबदला देण्याची तरतुद करण्यात आली आहे.

- भारतातील कोणत्याही गावाचा अथवा ग्रामीण समुदायाचा जनप्रतिनिधी म्हणून एखादी व्यक्ती किंवा व्यक्ती समुह किंवा शासकिय अथवा अशासकीय संस्था कोणत्याही अधिकृत केंद्राकडे त्यांच्या या संवर्धनाच्या योगदाना बद्दल मोबदल्या साठी अर्ज करू शकते.
- समुदायाचे अधिकार (अधिनियमातील कलम ४१)

१) कोणतीही व्यक्ती किंवा यांचा समूह (जो शेतीशी प्रत्यक्षरित्या संबंधीत असेल किवा नसेल) किंवा कुठलीही सरकारी अथवा बिगरसरकारी संस्था, भारतातील कुठल्याही गावातर्फे किंवा स्थानिक समुदाया तर्फे त्या समुदायाच्या प्रजाती विकासातील योगदानामुळे निर्मित प्रजातींच्या नोंदणीसाठी किंवा संरक्षणासाठी अर्ज करू शकते.

२) प्राधिकरणाने उपकलम (१) अंतर्गत अधिसुचित केलेले केंद्र, सरकारी किंवा बिगर सरकारी संस्थांनी केलेल्या अर्जांचा साकल्याने विचार करून त्यातील त्यागावाचे वा समुहाचे प्रजाती विकासातील योगदानाचे योग्य मुल्यमापन करून तो अर्ज मोबदल्यासाठी अथवा संरक्षणासाठी सर्वस्वी योग्य असल्याची खात्री करून घेतली जाईल.

३) प्राधिकरण अशा योग्य अर्जांची छाणनी करून व योग्य अशा प्रजातींच्या परीक्षणानंतर अशा प्रजातीची नोंदणी करून संरक्षीत करू शकते.

## ५.४ शेतकऱ्यांचे हक्क

या कायद्यात शेतकरी हा फक्त शेती करणारा न समजता तो शेतीतील विविध प्रजातींचे जतन व प्रजनन करणारा महत्त्वाचा घटक समजला जाणार आहे. या कायद्याअंतर्गत शेतकऱ्यांनी जतन/संवर्धन/विकसित केलेल्या प्रजातींची नोंदणी करण्याची तरतूद आहे. जेणे करून त्याचे व्यवसायिक पैदासकरांकडून होणाऱ्या अवैध वापरापासून संरक्षण करता येईल. जे शेतकरी नवीन वाण विकसित करण्यात योगदान करतात त्याना पीक पैदासकरांप्रमाणेच नोंदणीकरण व पीक वाण संरक्षणाचे हक्क देण्याची तरतूद या कायद्यात आहे.

- शेतकऱ्यांचे वाणाचे प्रचलीत वाण (Extant Variety) म्हणून नोंदणीकरण करता येईल.
- शेतकरी, संरक्षित वाणाचा कोणत्याही प्रकारे वापर करणे, विक्री करणे जसे मोठ्या प्रमाणात लागवड करून उत्पन्न घेणे, त्या वाणाची देवाण घेवाण करणे पूर्वी प्रमाणेच करू शकतील मात्र संरक्षित वाणाची शेतकरी बंद पिशवी मध्ये अधिकृत नावाने विक्री करू शकणार नाहीत.
- शेतकरी, पिकांच्या अनुवंशिक साधनांच्या संवर्धन करण्यात, देशी (गावठी) प्रजाती व विविध पिकांच्या मौल्यवान जंगली प्रजातींच्या संवर्धनाच्या योगदानासाठी बक्षिस पात्र असतील.



- एखादा संरक्षित वाण अपेक्षित गुणवत्ता देऊ शकला नाही तर शेतकरी सदर कायद्याच्या कलम ३९(२) अन्वये नुकसान भरपाईस पात्र असेल.
- शेतकऱ्यांना सरद कायद्यान्वये प्राधिकरणाच्या कार्यप्रणाली दरम्यान, न्यायिक मंडळा समोर अथवा न्यायालयीन बाबीसाठी कोणतेही शुल्क भरणे बंधनकारक नसेल.

### ५.५.१ अधिनियमातील शेतकऱ्यांचे अन्य अधिकार

वरील नमूद केलेल्या अधिकारांव्यतिरिक्त इतर अनेक अधिकार शेतकऱ्यांना देण्यात आलेले आहेत. शेतकऱ्यांनी जोपासलेल्या किंवा संवर्धीत केलेल्या वाणांचा, नवीन वाण तयार करताना वापर केल्यास याची नोंद घेण्याची सोय करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या पूर्व परवानगीशिवाय पीक पैदासकार प्रचलीत वाणांचा वापर करून पुनरूत्पादीत वाण (EDV) तयार करू शकणार नाही.

कोणत्याही शेतकरी किंवा शेतकऱ्यांच्या समुदायाचे जोपासलेल्या किंवा संवर्धीत केलेल्या वाणाची नोंदणी करण्यासाठी किंवा संरक्षित करण्यासाठी अर्ज करू शकते. अशा अर्जांना अधिसुचित केंद्रे संबंधीत अधिकाऱ्याकडे विचारासाठी पाठवू शकतात. जर एखादा शेतकरी अशिक्षीत असेल किंवा त्याला या विषयांचे/कायद्याचे ज्ञान नसेल, तर त्याच्या वतीने दुसरा शेतकरी किंवा कोणीही व्यक्ती यासाठी अर्ज करू शकते. जर समुदायातर्फे केलेला अर्ज ग्राह्य असेल तर फायद्यातील वाटा त्यांना देण्याची सोय या कायद्यामध्ये केलेली आहे. अशा वाणांचा वापर करून तयार केलेल्या वाणांतून मिळणाऱ्या नफ्याचा काही भाग राष्ट्रीय जनुकीय निधी (National Gene Fund) मध्ये जमा केला जाईल.

### ५.५.२ अधिकारांच्या उल्लंघनाविरूद्ध तसेच नकळतपणे केलेल्या चुकांपासून संरक्षण

हा कायदा लागू झाल्यानंतर पीक पैदासकारांच्या अधिकारांचे नकळतपणे उल्लंघन होण्याच्या अनेक घटना घडतील अशी चिंता अनेकांना होती. कोणत्याही शेतकऱ्यांवर या कायद्यात उल्लेख केलेल्या अधिकारांचे नळकतपणे उल्लंघन केले असेल तर या कायद्याच्या कलम ४३ अन्वये त्याच्यावर कसल्याही प्रकारचा खटला चालवता येणार नाही अशी तरतूद केलेली आहे. पण त्याला असे अधिकार अस्तित्वात असल्याची माहिती नव्हती हे न्यायालयात सिध्द करावे लागेल.

### ५.५.३ शुल्कात सूट

कोणत्याही पीक प्रजातीच्या नोंदणी व संरक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या डस(DUS) चाचणीसाठी लागणाऱ्या शुल्कातून शेतकऱ्यांना विशेष सुट देण्यात आलेली आहे. शेतकऱ्याला

जर कुठलीही कागदपत्रे, अर्ज वा अधिनियमाची कागदपत्रे, विविध कार्यवृत्तांत, निर्णय वा नियमांच्या प्रती हव्या असतील तर त्या शेतकऱ्याला कुठलाही शुल्क अकारला जाणार नाही अशी तरतूद या कायद्यात आहे.

### ५.६ समुदायाचे अधिकार

स्थानिक समुदायांना आपल्या क्षेत्रातील जैवविविधतेच्या स्वामित्त्वाचे अधिकार आहेत. कारण ते त्यांचे संवर्धन व संरक्षण करतात. तसेच त्यांना त्या वाणांच्या विविध गुणांची व उपयोगांची चांगली माहिती असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर त्यांना त्यांचे पूर्ण ज्ञान असते. त्यांच्या या उपजत ज्ञानामुळे त्यांना काही अधिकार प्राप्त होतात, जे या जैवविविधतेच्या व्यावसायिक उपयोगात होणाऱ्या भागीदारीत लाभदायक ठरू शकतात. शेतकऱ्यांच्या समुहांद्वारे पैदास केल्या गेलेल्या भू-प्रजाती या आधुनिक पीक पैदास व वैश्विक खाद्य सुरक्षिततेसाठीचा पाया आहेत. या भू-प्रजाती (या अशा स्वयंनिर्मित प्रजाती आहेत ज्यांचा) आधुनिक पीक पैदास करण्यासाठी प्रामुख्याने वापरल्या जातात व त्यांचा एकमेव पैदासकार म्हणून मिळणाऱ्या अधिकरांवर त्या समुदायाचा हक्क आहे. शेतीत काम करणाऱ्या महिला व पुरूषांनी खाद्य व नगदी पिकांच्या अशा हजारो जाती केवळ जतन केलेल्या नसून त्यातील प्रमुख चांगल्या जनुकांना व गुणांना ओळखून त्यांचे संकर व निवड अशा गुंतागुंतीच्या प्रक्रियेच्या माध्यमातून पिढ्यानपिढ्या जतन केलेले आहेत हे लक्षात घेतले पाहिजे.

अशा समुदायांनी केवळ किटकनाशक प्रतिबंधक व जैवनियंत्रणाच्या गुंतागुंतीच्या प्रक्रियाच विकसित केल्या नाहीत तर त्यांनी जनुकांच्या अशा साखळ्यांची ओळख/निवड केली आहे. या निवडीतून त्यांनी व्यावसायिक व घरगुती वापरासाठी मुल्यवान असणाऱ्या गुणांनी संपन्न असणाऱ्या प्रजाती विकसित केल्या आहेत. म्हणजेच एखाद्या विशिष्ट गुणांसाठी तयार केले गेलेले जनुक हे त्यांच्या कडून पिढ्यानपिढ्या संरक्षित केले गेले आहेत. या जनुकांमध्ये रोगप्रतिकार क्षमता, खारवट जमिनीतील अनुकुलता, पानथळ जमिनीतील अनुकुलता आणि पाण्याचा ताण सहन करण्याच्या क्षमतेसारखे विशेष गुण प्रदान करणारे जनुक एकत्र आलेले आहेत. या व्यवसायिक गुणांव्यतिरिक्त शिजवण्यासाठी लागणारा वेळ, चव, पचनशिलता यासारख्या अनेक गुणांना ओळखून, नवीन प्रजाती विकसित करून त्यांचे जनत व संवर्धन केलेले आहे. वास्तवात बियाण्यांच्या साठवणूक व निवड प्रक्रियेत ग्रामीण महिलांचे योगदान फार मोठे आहे. त्या महिला अशा प्रकारच्या ज्ञानाच्या स्त्रोत आहेत. अशा गुंतागुंतीच्या बीज प्रक्रिया व संवर्धनाच्या ज्ञानाच्या त्या स्वामिनी आहेत. अनुवंशिक आधारावर निवड, संरक्षण व संकर करून केलेले प्रजनन या सर्व प्रक्षेत्रावर केल्या गेलेल्या प्रक्रिया असून हे सर्व कार्य कृषि वैज्ञानिकांनी त्यांच्या कृषि संशोधन संस्थांच्या प्रक्षेत्रावर केलेल्या संशोधनापेक्षा कुठल्याही प्रकारे कमी नाही.



## ६ पीक वाणांचे नोंदणीकरण (Plant Variety Registration) :

<table>
<tr>
<td>● ज्या पिक वाणाची नोंदणीकरण करावयाचे आहे त्या वाणाने वेगळेपणा(Distinctness), एकसारखेपणा (Uniformity), स्थिरता (Stability) अर्थात (DUS) या निकषांची पुर्तता करणे आवश्यक असते. केंद्र सरकार त्यांच्या अधिकृत संकतेस्थळावर नोंदणीकरीता आलेल्या वाणांसंबंधी नोंदणीच्या दृष्टीने प्राधिकरणाच्या शासकीय परिपत्रकात माहिती प्रकाशित करते.</td>
<td rowspan="2">प्राधिकरणाची विविध प्रकाशने :<br>● भारतीय पीक वाण नियतकालीक<br>● सर्वसाधारण व पीक निहाय डस चाचणी मार्गदर्शिका<br>● प्राधिकरणाची तांत्रिक पुस्तीका<br>● जनुकीय कोष नियतकालीक<br>● कृषि जैव विविधता तीव्र क्षेत्र पुस्तिका(दोन खंड)<br>● "उदर निर्वाहासाठी बियाणे" नावाची सीडी जी प्राधिकरणा संदर्भात विविध कार्यप्रणालींची संकलीत माहिती देते.<br>● वार्षिक संकलन पुस्तिका</td>
</tr>
<tr>
<td>● आजतागायत प्राधिकरणाने विविध ५७ पिक वाणांसाठी नोंदणीकरणाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्या करिता पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरणाने वेगळेपणा (Distinctness) एकसारखेपणा (Uniformity), स्थिरता (Stability), अर्थात (DUS) तपासणी करीता पिकनिहाय मार्गदर्शक तत्वे विकसित केले आहेत. या पिकांमध्ये गहू, साळ, मका, ज्वारी, बाजरी, हरभरा, तूर, मुग, उडीद, मटकी, वाटाणा, मसुर, कपाशी, ज्यूट, ऊस, आले, हळद, मोहरी, आंबाडी, जवस, सुर्यफुल, करडई, एरंड, तीळ, भुईमुग, सोयाबीन, काळी मिरी, विलायची, गुलाब, शेवंती, आंबा, बटाटा, टोमॅटो,. वांगे, भेंडी, फुलकोबी, कांदा, लसून, इसबगोल, दमास्क, गुलाब, ब्राम्ही, मंचाल इत्यादी पीकांचा समावेश आहे.</td>
</tr>
</table>

### ६.१ नोंदणीकरीता आवश्यक नोंदणीशुल्क

(शेतकऱ्यांच्या वाण नोंदणीकरीता कोणतेही शुल्क आकारले जात नाही) :
पिकवाणाच्या-नोंदणीकरिता अर्जासोबत प्राधिकरणाने निर्धारीत केलेली नोंदणीशुल्क रचना खालील प्रमाणे :

| अ.नं. | पिकवाणाचा प्रकार | नोंदणीकरिता आवश्यक शुल्क |
|---|---|---|
| १. | बियाणे कायदा १९६६ मधील भकाग ५ मध्ये नोंदणीकृत प्रचलीत वाण (Extant Variety) | रू. १०००/- |
| २. | नवीन वाण/प्रचलीत वाणांचा वापर करून पुनरूत्पादीत वाण (Essentially Derived Variety) | व्यक्तीगत रू. ५०००/-<br>शैक्षणिक संस्था रू. ७०००/-<br>व्यवसायिक रू. १००००/- |
| ३. | प्रचलीत वाण ज्याबद्दल सर्वांना माहिती आहे. (Variety of Common Knowledge) | व्यक्तीगत रू. २०००/-<br>शैक्षणिक संस्था रू. ३०००/-<br>व्यवसायिक रू. ५०००/- |

## ६.२ पीक वाण संरक्षणाचा कालावधी :

शेती पिके – १५ वर्ष (प्रथम संरक्षण ६ वर्षासाठी व नुतनीकरणानंतर ९ वर्षांसाठी)

फळ पिके – १८ वर्ष (प्रथम संरक्षण ९ वर्षासाठी व नुतनीकरणानंतर ९ वर्षांसाठी)

वार्षिक नुतनीकरण फी भरून संरक्षित वाणाचा नुतनीकरण कालावधी कालापरत्वे वाढवता येईल.

## ७. राष्ट्रीय जनुकिय कोष : (National Gene Bank)

प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय जनुकिय कोषाची स्थापना करण्यात आलेली आहे. या कोषामध्ये संरक्षित पीक वाणाचे बियाणे तसेच पीक पैदासकाराने नोंदणी करण्यासाठी जमा करण्यात आलेल्या वाणांच्या मातृ जातींची साठवणूक व जपवणूक करण्यात येते. संरक्षित कालावधीकरीता सदर बियाणे ५०से. तापमानास साठविले जाते आणि वेळ पडल्यास काही वर्षानंतर कोषातील अशा बियाणांचे पुनरूत्पादन घेऊन पुनर्निर्मिती अर्जदाराच्या नोंदणीशुल्कातील पैशातून करण्यात येते. संरक्षित बियाणांच्या बाबत काही तंटा निर्माण झाल्यास तंटा सोडविण्यासाठी अथवा सक्तीची नोंदणी करण्यासाठी जनुकीय कोषातील बियाणांचा उपयोग होणार आहे. राष्ट्रीय जनुकीय कोष व्यवसायिक बियाणे उद्योगातील गैरप्रकारांना रोखण्यासाठी एक मैलाचा दगड ठरणार आहे. संरक्षित पीक वाणाचा संरक्षण कालावधी संपल्यानंतर जनुकीय कोषातील त्याचे साठवणूक केलेले बियाणे जनतेच्या वापराकरीता कालापरत्वे खुले होईल.

## ८. राष्ट्रीय जनुकिय निधी : (National Gene Fund)

जे शेतकरी जैवविविधतेचे संरक्षण करतात ते बहुतांश आदिवासी, ग्रामीण महिला वा पुरूष असतात. या प्रजाती रोग व कीड प्रतिकारक शक्ती, अजैविक ताणाला प्रतिकार व पाण्याचा सुयोग्य वापर, यासारख्या विशेष गुणांमुळे त्या स्थानिक वातावरणात अनुकुलीत झालेल्या असतात. अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती, तृणधान्य, कडधान्य, जैवविविधतेने नटलेल्या भाजीपाल्याच्या प्रजाती या आदिवासी ग्रामीण महिला वा पुरुषांनी वर्षानुवर्षे जपणूक केलेल्या असतात. या प्रजाती आधुनिक पीक पैदास व जनुकीय तंत्रज्ञानाचा वापर करून बनविल्या जाणाऱ्या नवीन वाणांचा मुख्य आधार आहेत. आदिवासी, ग्रामीण महिला व पुरुष, जैव विविधतेचे संरक्षण वर्षानुवर्ष करत आलेले आहेत. अशा कामांसाठी त्यांना बाहेरून कुठल्या मदतीची आवश्यकता भासत नाही; परंतु हे काम ते एकट्याने करू शकत नाहीत आणि जर त्यांच्या या श्रमाचा त्यांना योग्य मोबदला दिला गेला नाही तर आपल्या पुर्वजांनी जतन केलेली ही जैविक संपत्ती फार काळ टिकवू शकणार नाहीत.



जे शेतकरी आर्थिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा पिकांचा, भू-प्रजातींचा व अन्य वन्य (रानटी वाण/जाती) प्रजातींचे संरक्षण व संवर्धन करण्याच्या कामात गुंतलेले आहेत, ते असा मोबदला/लाभ मिळवण्यास पात्र आहे; परंतु हे वाण या कायद्याअंतर्गत संरक्षित केलेल्या वाणांच्या निर्मितीत जनुकांचा स्त्रोत म्हणून वापरल्या गेलेल्या असाव्यात. शेतकरी, पैदासकार व समुदाय यांना या निधीमधूनच नुकसान भरपाईसुध्दा देण्यात येऊ शकते. राष्ट्रीय जनुकीय निधी जमविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी सामुग्रीची विक्री, वार्षिक शुल्क व स्वामित्व शुल्क, मिळालेली नुकसान भरपाई आणि राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मिळालेली आर्थिक मदतीचा उपयोग होतो. भागीदारीतून केल्या जाणाऱ्या शेती सुधार योजनांना या कायद्याच्या कलम ४५ नुसार हा निधी दिला जाऊ शकतो. आर्थिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण अशा वाणांच्या व पिकांच्या जतन, जोपासना, संवर्धन व संरक्षणासाठी अदिवासी व ग्रामीण समुदायाच्या प्रयत्नांना मदत करणे हा जुनक निधीचा मुख्य उद्देश आहे.

प्राधिकरणातर्फे राष्ट्रीय जनुकिय निधीची निर्मिती करण्यात आलेली असून निधीचा स्त्रोत खालील प्रमाणे असेल.

- पीक पैदासकारांकडून त्यांच्या संरक्षित वाणांच्या फायद्यातून निर्धारीत पध्दतीने किंवा संरक्षित वाण अथवा त्यांचे पुनरूत्पादनक्षम भागाच्या फायद्यातील निर्धारीत रक्कम
- स्वामित्व शुल्का मार्फत प्राधिकरणाकडे जमा होणारे वार्षिक शुल्क
- पीक पैदासकारा कडून प्राधिकरणाकडे जमा होणारी मोबदला रक्कम
- राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय व इतर संस्थामार्फत प्राधिकरणाला होणारी आर्थिक मदत

जनुकिय निधीचा विनियोग पुढील गोष्टींकरीता केला जाऊ शकतो.

- नफ्यातील वाट्यासाठी मागणी करणाऱ्या व्यक्तीला अथवा समुहाला मोबदला रक्कम अदा करण्यासाठी
- शेतकरी/शेतकरी समुहाला नुकसान भरपाई अदा करण्यासाठी
- जनुकिय संसाधनांच्या संवर्धनासाठी व शाश्वत पुरवठ्यासाठी पाठबळ देण्याकरिता करण्यात येणाऱ्या खर्चासाठी, देशांतर्गत व देशाबाहेरी संकलनासाठी, पंचायतींच्या संसाधनांच्या संवर्धनासाठी, शाश्वत वापराकरिता व बळकटीकरणाकरीता या जनुकिय निधीचा वापर होणार आहे.

## ९. नफ्यातील वाटा (Benefit Sharing)

पीक वाण व शेतकरी हक्क संरक्षण कायद्यांतर्गत नफ्यातील वाटा हा शेतकऱ्यांच्या हक्कांचे संवर्धन करणारे सर्वात महत्त्वाचा मुद्दा अंतर्भूत करण्यात आला आहे. या काद्यातील

कलम २६ अन्वये नफ्यातील वाट्याच्या हक्कासाठी कोणतीही भारतीय व्यक्ती किंवा शासकिय अथवा अशासकीय संस्था की जी देशात स्थायिक असून देशातच कार्यरत असेल. नफ्यातील वाटा मागणाऱ्या हक्क धारकाच्या जनुकिय संसाधनांचा एखादा नवीन पीक वाण निर्मितीकरीता एखाद्या पीक पैदासकाराने किती प्रमाणात व कसा वापर केला आणि त्या उत्पादीत वाणाची व्यवहाराकरीता व बाजारातील मागणी लक्षात घेवून सदरहू पीक पैदासकरास त्याला झालेल्या नफ्यातील वाटा हक्क धारकास अदा केला जाईल. अशाप्रकारे प्राधिकरण प्रमाणपत्रक वितरीत करीत असताना त्या संदर्भातील विविध माहिती प्रकाशित करून नफ्यातील वाट्याच्या हक्क धारकांसाठी त्यांनी पुढे येण्यासाठी भारतीय पीक वाण नियतकालीकां मार्फत प्रोत्साहित करीत असते.

### १०. सहयोगी देश (Convention Countries)

आंतरराष्ट्रीय पीक वाण संरक्षणाच्या तरतुदींचे पालन करणाऱ्या देशाला सहयोगी देश म्हणून संबोधले जाते. कारण याच तरतुदींच्या आधीन राहून भारताने आपले पीक वाण संरक्षित केले आहेत. दोन्ही देशांचे नागरिकत्व असलेल्या पीक पैदासकाराला पीक वाण प्राधिकरण संरक्षण हक्क प्रदान करू शकते. एखाद्या पीक पैदासकाराने सहयोगी देशामध्ये एखाद्या पीकवाण संरक्षणार्थ अर्ज दाखल केल्यापासून एक वर्षाच्या आत (तारखेच्या बारा महिने कालावधीच्या आत) भारतामधेही तोच पीकवाण संरक्षित करण्यासाठी अर्ज करून त्या पिकवाणास संरक्षित केले असल्यास त्याने सहयोगी देशात नोंदणी करीता दाखल केलेल्या अर्जाच्या तारखेपासून सदर पीकवाणास भारतातही संरक्षित केल्याचे गृहीत धरण्यात येइल व हीच तारीख नोंदणीकरणाची तारीख म्हणून ग्राह्य धरली जाईल.

### ११. वनस्पती जैव विविधता जतन समुह बक्षिस (Plant Genome Savior Award) :

जो शेतकऱ्यांचा समुह वेगवेगळ्या भूप्रजाती, जंगलीवाण व तेथिल स्थानिक प्रजातींचे किंवा वाणांचे वर्षानुवर्षेजतन व संवर्धन करतात अशा सामुहीक प्रयत्नांना मान्यता मिळवुन देण्यासाठी कृषि मंत्रालय भारत सरकार तर्फे दर वर्षी वनस्पती जैव विविधता जतन समुह बक्षिस देण्यात येते. या बक्षिसात रोख रू. १० लाख व प्रशस्तीपत्राचा समावेश असतो. यासाठी ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिण्यात जाहीरात येते.

### १२. पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायाधिकरण (Plant Varieties Protection Appellate Tribunal)

पीकवाण व शेतकरी हक्क संरक्षण प्राधिकरणाचे पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायाधिकरणाद्वारे नियंत्रण केले जाईल. प्राधिकरणाच्या (एक प्रतिनिधी अथवा नोंदणीकर्ता या नात्याने) कुलसचिवांमार्फत निर्गमित सरंक्षित पीक वाणांसंदर्भातील सर्व प्रकारचे निर्देश अथवा निर्णयासंदर्भात या न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल. त्याचबरोबर प्राधिकरणाने नफ्यातील वाट्यासंदर्भात, सक्तीच्या नोंदणीसंदर्भात आणि नुकसान भरपाई संदर्भात दिलेले निर्देश अथवा निर्णयासंबंधी अपील या न्यायाधिकरणीकडे करता येईल. सदर न्यायाधिकारणाची स्थापना होईपर्यंत बौध्दिक स्वामित्व अपीलीय बोर्डाकडे वरील बाबींकरीता दाद मागता येईल व या बोर्डाच्या कक्षेत वरील बाबींची कार्यवाही सुरू राहील. पीक वाण संरक्षण अपीलीय न्यायाधीकरणाकडील निर्णयासंदर्भात उच्च न्यायालयाकडे दाद मागता येईल. सदर न्यायाधिकरणाने आलेल्या अपीलांचा निपटारा एक वर्षाच्या आत करणे अभिप्रेरीत आहे.

अशा प्रकारे पिकपैदासकारांनी त्यांच्या नवनवीन वाणांची पीक वाण व शेतकरी हक्क प्राधिकरणाकडे नोंदणी केल्यास नवनिर्मित वाणांच्या स्वामित्व हक्काचे जतन करण्याबरोबरच इतर अधिकार व फायद्यांचे जतन करण्यासाठी हा कायदा मैलाचा दगड ठरणार आहे. शेतकरी बांधवांनी त्यांनी केलेल्या पारंपारीक वाणांचे जतन व संवर्धनाच्या योगदाना करीता त्यांचा यथोचीत गौरव करून योग्य तो मोबदला दिला जाणार आहे. शेतकऱ्यांनी त्यांच्या वैविध्यपुर्ण वाणांची प्राधिकरणाकडे नोंदणी करून पिकपैदासकारां प्रमाणेच हक्क व फायदा करून घेणे या कायद्यामुळे आता शक्य झाले आहे.


संपर्कासाठी पत्ता :

पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण

एस. २, अे. ब्लॉक, एन.ए.एस.सी. संकुल, देव प्रकाश शास्त्री मार्ग,

नवी दिल्ली - ११० ०१२

फोन नं. - ०११-२५८४३३१५, २५८४०७७७, २५८४३८०८

फॅक्स - ०११-२५८४०४७८

वेबसाईट : www.plantauthority.gov.in,

E-mail : ppvfra-agri@nic.in

परिशिष्ट १

## शेतकरी वाण नोंदणी अर्जाचा नमुना

(मुळ अर्ज इंग्रजीत असून इंग्रजीतच सादर करावा लागतो)

(पहा कलम १८ मधील उपकलम (१))

(अर्जदारासाठी नमुना : ज्या प्रश्नासमोर चौकोन असतील तेथे योग्य पर्यायावर(✔)अशी खुण करावी आणि इतर प्रश्नांची उत्तरे सुवाच्च अक्षरात किंवा व्यवस्थित टंकलिखीत करून नोंदवावेत)

१. अर्जदाराची/अर्जदारांची ओळख

अ. शेतकरी

ब. शेतकऱ्यांचा गट

क. शेतकऱ्यांचा समुह

टीप : पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा – २००१ अंतर्गत शेतकरी वाणाच्या नोंदणीचा अर्ज शेतकरी शेतकरी गट किंवा शेतकरी समूहा कडून करत असताना त्या अर्जासोबत तेथील पंचायत जैवविविधता व्यवस्थापन समिती किंवा जिल्हा कृषि अधिकारी किंवा राज्या कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक किंवा जिल्हा अदिवासी विकास अधिकाऱ्याचे संमती/अनुमती पत्र जोडावे.

२. अर्जदाराचे नाव/अर्जदारांची नावे

अ. अनुक्रमांक

ब. नाव

क. संपूर्ण पत्ता

ड. राष्ट्रीयत्व

३. या अर्जा संबंधात ज्यांच्याशी संपर्क साधायचा आहे त्यांचे नाव व संपर्काचा पत्ता (गरजेनुसार अर्ज पी.व्ही.–१ मधील अधिकृत परवानगी पत्र जोडावे)

नाव

पत्ता

दुरध्वनी क्रमांक

फॅक्स

ई–मेल



४. वाणाबाबतची सामान्य माहिती

अ. पिकाचे सामान्य नाव

ब. पिकाचे वनस्पती शास्त्रीय नाव

क. पिकाचे कुळ/गट

ड. वाणाचे नाव(इंग्रजी पहिल्या बाराखडीत)

टीप : वनस्पतीशास्त्रीय नाव म्हणजे लागवडी खालील वनस्पतींच्या नामकरणाचे आंतरराष्ट्रीय संकेत – २००४ अनुसार अधिकृतपणे मान्य केलेले शास्त्रीय नाव.

५.(अ) उमेदवार वाणाची वर्गवारी/प्रतवारी

विशिष्ट प्रकारचा/नुमनेदार वाण

इतर (स्पष्ट करा/खुलासा द्या)

टीप : विशिष्ट प्रकारचा/नुमनेदार वाण म्हणजे असा वाण जो संकरीत नाही, पुनरूत्पादीत वाण नाही आणि (उदा. शुध्द वाण/मातृ वाण/संयुक्त वाण किंवा प्रजाती)

६. ज्याने/ज्यांनी उमेदवार वाणाची पैदास केली आहे त्या शेतकऱ्याचे नाव/शेतकऱ्यांची नावे

वाण

नाव

पत्ता

दुरध्वनी क्रमांक

फॅक्स

ई–मेल

राष्ट्रीयत्व

टीप : जर एकापेक्षा जास्त शेतकरी असतील तर वरील नमुन्यानुसार (i) (ii) व असेच या प्रमाणे घ्यावेत. गरजेनुसार अतिरीक्त पान जोडावे. जर वाण एकत्रितरित्या शेतकऱ्यांच्या गटाने/समुहाने विकसीत किंवा संवर्धीत केली असेल तर प्रपत्र १ नुसार अनुमती/संमती पत्र जोडावे.

७. उमेदवार वाणाचा व्यापारी दृष्ट्या वापर झाला आहे का?

होय

नाही

जर होय असेल तर खालील माहिती भरावी

वाणाच्या प्रथम विक्रीची तारीख

देश/देशांची नावे जेथे व्यापारी दृष्ट्या वाणाचे उत्पादन केले गेलेले आहे. (लागू होत असेल तर)

प्रथम नोंदणी नंतर वाणाच्या महत्त्वपूर्ण गुणधर्मामध्ये झालेले बदल (अतिरीक्त पान जोडा)

वाणासाठी वापरलेले नाव

जर असेल तर – वापरलेले व्यापार चिन्ह

मी/आम्ही ---------------- येथे घोषीत करतो की, या वाणाची निर्मीती करताना वापरलेले संसाधने जनुकीय--------किंवा मातृ ------ हे कायदेशीररीत्या मिळविलेले आहे.

अर्जदाराची सही

अर्जा सोबत खालील अतीरिक्त प्रमाणपत्रे जोडावीत (योग्य ठिकाणी सही व शिक्क्यासह) (सर्व अर्जावर व प्रमाणपत्रांवर मुळ सह्या असाव्यात)

अ. संपूर्णपणे भरलेला अर्ज

ब. शेतकरी वाणाच्या बाबतीत प्रपत्र १ प्रमाणे अनुमती/संमती पत्र

क. अर्ज पीव्ही – १ मधील अधिकृत परवाणगी पत्र (लागू असेल तर)



परिशिष्ट २

पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा–२००१ अंतर्गत शेतकरी वाणाच्या नोंदणी

## अर्जास अनुमती/संमतीपत्र

(मुळ संमतीपत्र इंग्रजीत आहे)

०१ अर्जदार शेतकऱ्याचे नाव/नावे/शेतकऱ्यांचे समुह/शेतकऱ्यांचा गट

| अ.क्र. | नाव (आडनावासह)/गटाने नाव/समूहाचे नाव | कायमचा पत्ता |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

०२.वाणाचे नाव

०३.अ. (एकट्या अर्जदार शेतकऱ्यासाठी)

मी येथे घोषीत करतो की, मी मागच्या बऱ्याच वर्षापासून कायमचा पीक लागवडधारक असून..........राज्यातील..........जिल्ह्यातील.......पंचायत/तालुकल्यातील...........या गावाचा रहीवासी असून माझे कुटूंब हेच .......... या पिकाच्या (पिकाचे सामान्य नाव) आणि ....... (वनस्पतीशास्त्रीय नाव)...... या वाणाच्या विकास व संवर्धनात सहभागी आहे.

०३.ब. (शेतकऱ्यांचा गट/शेतकऱ्यांचा समूहासाठी)

आम्ही येथे घोषीत करतो की, आमच्या मागच्या बऱ्याच वर्षापासून आम्ही कायमचे पीक लागवडधारक असून..........राज्यातील..........जिल्ह्यातील....... पंचायत/ तालुकल्यातील ........... या गावाचा रहीवासी असून आम्ही .......... या पिकाच्या (पिकाचे सामान्य नाव) आणि ....... (वनस्पतीशास्त्रीय नाव) ...... या वाणाच्या विकास व संवर्धनात सहभागी आहोत. आम्ही आमच्या गट/समुहाच्या वतीने...... यांच्या नावाने परवानगी देत आहोत. जो आमच्या गटाचा सभासद असून तो ...... येथील कायमचा रहीवासी आहे(संपूर्ण पत्ता). जो आमच्या वतीन सर्व सह्या करण्यासाठी फक्त या वाणाच्या पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा – २००१ अंतर्गत नोंदणी करण्याच्या कामासाठी अधिकृतपणे घोषीत करत आहोत.

दिनांक ..........

ठिकाण .........

अधिकृत परवानगी असलेल्या शेतकऱ्याचे/गटाचे नाव व स्वाक्षरी

(सही अनुमती देणाऱ्या अधिकाऱ्यासमोर करावी)

हे येथे प्रमाणीत केले जात की, वर नमुद केलेल्या उमेदवार वाणाचा विकास/संवर्धन/....... अर्जदार शेतकरी/शेतकऱ्यांचा समुह/शेतकऱ्यांचे गटाने केलेला आहे. जो/जे वर नमुद केलेल्या गावाचा रहीवासी आहे/आहेत. आणि मी अर्जदाराशी/शेतकरी समुहाशी व त्यांच्या वाण विकासाच्या प्रयत्नांशी पूर्णपणे अवगत आहे.(नको असलेल्या गोष्टी खोडाव्यात)

दिनांक ..........

ठिकाण .........

सही.......................................

नाव.....................................................................

(संबंधीत पंचायतीच्या जैव विविधता व्यवस्थापन समितीचा प्रमुख/सचिव किंवा संबंधीत जिल्हा कृषि अधिकारी किंवा संबंधीत राज्य कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक किंवा संबंधीत जिल्हा अदिवासी विकास अधिकारी अधिकृत कार्यालयीन रबरी शिक्क्यासह)

---

## अर्ज – पी व्ही १
### (पहा नियम २५)

पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क कायदा – २००१

### अधिकृत परवानगी पत्र

मी/आम्ही ......... येते ......... यांना अधिकृत परवानगी देतो की, त्यांनी माझ्या/आमच्या वतीने आमच्या........ या पीकाच्या या नावाने संबोधलेल्या नवीन वाण/पुनरुत्पादीत वाण/प्रचलीत वाण/शेतकऱ्यांची प्रजाती च्या संबंधातील सर्व नोटीसा/आवश्यक गरजांच्या पुर्ततेसाठी व संपर्कासाठी जोपर्यंत मी/आम्ही उल्लेख करत नाही तोपर्यंत वर उल्लेख केलेल्या व्यक्तीशी संपर्क साधावा अशी नम्र विनंती करतो.

मी/आम्ही या संदर्भातील या पूर्वी केलेल्या (जर केल्या असतील तर) सर्व अधिकृत परवानग्या नाहीशा करतो.

---

सन...............या वर्षीच्या...............महिन्याच्या..............या दिवशी

सही/सह्या आणि व्यक्ती/व्यक्तींची नावे जे ही अधिकृत परवानगी देत आहेत. त्यांच्या हुद्दा आणि/किंवा कार्यालयीन शिक्क्यासह (असेल तर)

---

प्रती,
कुलसचिव,
पीक वाण नोंदणी
पीक वाण संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण,
नवी दिल्ली



# कृषि विज्ञान केंद्र, किल्ला - रोहा, रायगड
## अधिकारी व कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. मनोज सुधाकर तलाठी | कार्यक्रम समन्वयक |
| २. | प्रा. जीवन श्रीधर आरेकर | विषय विशेषज्ञ (वनस्पती विकृती शास्त्र) |
| ३. | डॉ. आनंद अमृतराव हणमंते | विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र) |
| ४. | प्रा. श्रीमती गितांजली अनंत वाईकर | विषय विशेषज्ञ (गृहविज्ञान) |
| ५. | डॉ. रणजीत प्रतापराव महाडीक | विषय विशेषज्ञ (कृषि विस्तार) |
| ६. | प्रा. माधव जनार्दन गित्ते | विषय विशेषज्ञ (मत्स्यशास्त्र) |
| ७. | प्रा. शशांक गणपत कदम | विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) |
| ८. | श्री. प्रमोद तानाजी यलमार | कार्यक्रम सहाय्यक |
| ९. | श्री. सुरेश देवजी पड्ये | सहाय्यक |
| १०. | श्री. सचिन सुदाम कार्ले | कार्यक्रम सहाय्यक |
| ११. | श्रीमती प्रियांका प्रमोद यलमार | कार्यक्रम सहाय्यक (संगणक) |
| १२. | कु. वैशाली रत्नाकर रेवाळे | कनिष्ठ लघुलेखक |
| १३. | श्री. बळवंत बाबूराव पाटील | वाहनचालक |
| १४. | श्री. सुभाष नारायण जाधव | वाहनचालक |
| १५. | श्री. सुरेश शंकर म्हादलेकर | माळी नि. शिपाई |
| १६. | श्री. किरण जयराम तांबे | पशुपरिचर नि. शिपाई |

